# प्रकरण ४

(अ) आस्थापना विषयक -

जेव्हा एखादे पद रिक्त असेल किंवा रिक्त होणार असेल त्यावेळी प्रमुख वैद्यकिय अधिक्षक व खाते प्रमुख (माआसे) (उपनगरीय रुग्णालये) यांच्या मार्फत कामगार अधिकारी/ अधिक्षिका, सेवा सुश्रुषा विभाग/ कार्यकारी आरोग्य अधिकारी यांना सदर रिक्त पद भरण्यासाठी प्रस्ताव / अहवाल सादर करण्यात येतो. जर एखादे नविन पद निर्माण करावयाचे असेल तर प्रमुख वैद्यकिय अधिक्षक व खाते प्रमुख (माआसे) (उपनगरीय रुग्णालये) यांच्याकडे तद्संबंधी प्रस्ताव सादर केला जातो. संबंधीत अधिका-यांच्या संमतीनंतर सदर नविन पद हे रिक्त पद भरण्याच्या पध्दती प्रमाणे भरले जाते.

(ब) खरेदी दुरुस्ती -

प्रमुख वैद्यकिय अधिक्षक व खाते प्रमुख (माआसे) (उपनगरीय रुगणालये) यांना वैद्यकिय उपकरणे दुरुस्ती व यांत्रिक खाते यांचे मार्फत प्रस्ताव सादर केला जातो. प्रमुख वैद्यकिय अधिक्षक व खाते प्रमुख (माआसे)/ सह आयुक्त वै. शि. आरोग्य / महापालिका आयुक्त / स्थायी समिती यांच्या मंजुरी नंतर खरेदीच्या मुल्यानुसार मध्यवर्ती खरेदी खाते / संबंधित कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येते.